MHRG040001032026

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०७/२०२६**</u>

श्री. हरिश्चंद्र रघुनाथ म्हात्रे व इतर वि. निरंक

<u>**निशाणी क्र. १ वरील आदेश**</u>

१. सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन १८२७ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** हे दिनांक २१.०८.२०२५ रोजी मौजे. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्युपत्र न करता मरण पावले आहेत. अर्जदार क्रं. १ ते ३ हे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचे मुले आहेत. अर्जदार हे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांचेशिवाय मयत **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांना अन्य कोणीही वारसदार नाहीत. **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांच्या आई शेवंताबाई रामदास म्हात्रे हया फार पुर्वी मयत झालेल्या आहेत तसेच **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांच्या पत्नी ठकाबाई रघुनाथ म्हात्रे या दिनांक १८.०९.२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार यांनी वारसदाखला मिळण्याकामी या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही. करीता सदर अर्ज वारसप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

३. अर्जदार क्र १ यांनी नि.क्र. ९ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. तसेच कागदपत्र म्हणुन **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचा मृत्यूदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१२, मयत ठकाबाई रघुनाथ म्हात्रे यांचे मृत्युदाखला प्रमाणित प्रत नि.क्र.१३, मौजे. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथील युनिट केस नं. ९६ च्या अवॉर्डची व्हेरीफाईड प्रत नि.क्र.१४, दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५०९/२०२३ च्या निशाणी १ व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत नि.क्र.१६, दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५०९/२०२३ ची झेरॉक्स प्रत नि.क्र.१७, अर्जदार यांच्या आधार कार्डच्या प्रमाणित प्रती नि.क्र. १५ ते

१५(२), पुरावा बंद पुरशीस नि.क्र. १९ दाखल केले आहेत.

४. अर्जासंदर्भात नि.क्र. ७ प्रमाणे जाहीरनामा व नि.क्र. १८ वरील 'दैनिक रायगड नगरी' वर्तमानपत्रातील दिनांक ३०.०१.२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. मात्र कोणत्याही ति—हाईत इसमाची याकामी हरकत प्राप्त झाली नाही.

५. दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** हे दिनांक २१.०८.२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ते ३ हे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचे मुले आहेत. करिता अर्जदार हे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचे कायदेशीर वारस आहे. नि.क्र. ७ वरील जाहीरनामा व नि.क्र.१८ वरील जाहीर नोटीस प्रसिध्द होउन देखील इतर कोणत्याही ति—हाईत इसमांनी याकामी हजर राहुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे **मयत रघुनाथ रामदास म्हात्रे** यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला आवश्यक त्या मुद्रांकशुल्क यावर देणेत यावा.

RAJSHRI MANOHAR GANVIR

Digitally signed by RAJSHRI MANOHAR GANVIR
Date: 2026.04.09 18:43:07 +0530

पनवेल

**दि.०९.०४.२०२६**

(राजश्री म. गणवीर)

**३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल**